प्रेसनोट दिनांक – ०४/१२/२०१७

## खंडणी बहाददर नामचीन गुंड अब्दुल गनी खान टोळी विरुध्द मोक्का अंतर्गत दोषारोप पत्र दाखल करण्यास मा.रश्मी शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे आदेश

खडक पोलीस ठाणे, गु.र.नं. २७३/२०१७, भा. द. वि. कलम ३८६, ३८७, ५०६(२), ४२७, ३४ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, भारताचा हत्यार अंधिनियम ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५, मधील आरोपी अब्दुल गनी खान रा.घोरपडे पेठ पुणे व त्याचे टोळीतील साथीदार २) अक्षय रोजश नाईक,वय २८ रा - १६४ घोरपउे पेठ पुणे ३) अक्रम नासीर पठाण, २७, रा - औंध डीपी रोड मेडीपाईन्ट हॉस्पीटल जवळ फ्लॅट नं. २/ई/२ पुणे. ४) अक्षय अंकुश माने वय - २३ रा - ६३८ घोरपडे पेठ पुणे यांनी फिर्यादी श्रीमती नजमा इसाक शेख वय – ६४ रा - ३०७ घोरपडे पेठ, शबिस्तान सोसायटी प्लॅट नं. ८ गॅलेक्सी बिल्डींग पुणे यांना त्यांचा चायनिज खादयपदार्थ विक्रीचा व्यवसाय असल्याने दरमहा २०००/- रु हप्ता व तो न दिल्यास चायनिज पदार्थ मध्ये विष कालवण्याची धमकी दिल्याने त्यांनी त्याबाबत तक्रार दिल्याने नमुद प्रमाणे खडक पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.अशाच प्रकारे त्यानी श्री मेहबुब हुसेन अल्लाना या व्यापा-याचे भावाचे अपहरण करुन त्यांना डांबुन ठेवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन अब्दुल गनी खान व त्यांचे साथीदार यांना त्यांचेकडुन पन्नास हजार रुपये खंडणी घेतली आहे.तसेच श्री इम्रान अफजल शेख या व्यापा-यास अब्दुल गनी खान व अक्षय राजेश नाईक यांनी पंचवीस हजार रुपयाची मागणी केली ते दिले नाही त्याकारणावरुन त्यांनी त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता तसेच श्रीमती लता ताटे यांचे पतीचे निधन झालेनंतर त्यांना मुलीचे शिक्षणासाठी पैशाची आवश्यकता भासल्याने आरोपीं अब्दुल खान याचे आईकडुन व्याजाने पैसे घेतले होते ते परत दिले नाही म्हणुन त्यांनी त्यांचे घर बळकावण्याचा प्रयत्न केला आहे.

दाखल गुन्हयाचे तपास करीत असताना,नमुद आरोपींनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९ या कायदयाचे उल्लघंन केल्याचे तपासत दिसुन आल्याने व त्यांचे विरुध्द या व्यतीरिक्त गेले १० वर्षाचे कालावधीत एकुण ११ गुन्हे संघटित व वैयक्तिकरित्या केल्याचे निष्पन्न झालेने त्या अनुषंगाने नमुद आरोपीं विरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९ चे कलमनुसार कारवाई करणे बाबतची परवानगी मिळणे कामी श्री राजेन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शना नुसार, श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक ,गुन्हे खडक पोलीस ठाणे पुणे शहर यांनी मा.अपर पोलीस आयुक्त,दक्षिण प्रादेक्षिक विभाग पुणे शहर यांना कलम २३(१) प्रमाणे प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावास श्री.रविंद्र सेनगांवकर,अपर पोलीस आयुक्त,दक्षिण प्रादेक्षिक विभाग पुणे शहर यांनी सदर कायदयाचे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंर्तभाव करण्याची मंजुरी देवुन,सदर गुन्हयाचा तपास श्री बाजीराव मोहिते सहा पो आयुक्त शहर विभाग पुणे शहर यांचेकडे देण्यात आला होता.

डॉ.बसवराज तेली पो उप आयुक्त,परिमंडळ-१ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.बाजीराव मोहिते सहा पो आयुक्त,शहर विभाग यांनी खडक पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक अनंता व्यवहारे,संजय गायकवाड,सतिश नागुल, राहुल जोशी, अर्जुन कुडाळकर गुन्हयाचा सखोल तपास करुन पुरावे गोळा करुन, सदर गुन्हयातील आरोपी विरुध्द दोषारोप पत्र दाखल करणे कामी मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर यांना अहवाल सादर केला असता सदर अहवालचे मा.रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी बारकाईन अवलोकन करुन, खंडणी बहाददर नामचीन गुंड अब्दुल गनी खान व त्याचे टोळी विरुध्द मोक्का कायदया अंतर्गत दोषारोप पत्र दाखल करण्यास मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी आदेश दिले आहेत.

POLICE INSP